12

**शासकीय पड / गायरान जमिनीकरीता शेतीसाठी झालेली अतिक्रमणे नियमानुकूल करणेबाबत विशेष मोहिम**

**महाराष्ट्र शासन**

महसूल व वन विभाग

शासन परिपत्रक क्रमांक : एलईएनल १०/२००४/प्र.क्र.४९/ज-१

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

दिनांक : ४.१२.२००८

**वाचा:-** १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक एलईएन १०९०/प्र.क्र.१७२/ज-१, दि.२८.११.१९९१.

२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक एलईएन १०९२/प्र.क्र.६५/ज-१, दि.२२.४.१९९२.

३) शासन पत्र, महसूल व वन विभाग क्रमांक एलईएन १०९२/प्र.क्र.६५/ज-१, दि.१६.१२.१९९८.

४) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्रमांक एलईएन १०९८/१५/प्र.क्र.४६/ ज-१, दि.२३.३.१९९९.

५) शासन परिपत्रक , महसूल व वन विभाग क्रमांक एलईएन १०/२००१/प्र.क्र.२२२/ ज-१, दि. १४.८.२००१.

६) शासन अर्ध शासकीय पत्र समक्रमांक दि.४.१२.२००४.

७) शासन परिपत्रक , महसूल व वन विभाग क्रमांक एलईएन १०/२००४/प्र.क्र.४९/ ज-१, दि. ९ मार्च, २००७.

**<u>शासन परिपत्रक :-</u>**

शासकीय पड / गायरान जमिनीवरील दि.१.४.१९७८ ते दि.१४.४.१९९० या कालावधीत शेतीसाठी झालेली व दि.१४.४.१९९० रोजी अस्तित्वात असलेली अतिक्रमणे शासन निर्णय दि.२८.११.१९९१ व शासन परिपत्रक दि.२२.४.१९९२ मधील अटी व शर्ती पूर्ण करीत असलेल्या अतिक्रमणदारांची अतिक्रमणे नियमानुकूल करण्याच्या सुचना दि.१६.१२.१९९८ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या आहेत. तसेच शासन परिपत्रक दि.२३.३.१९९९ अन्वये शासकीय पड / गायरान जमिनीवरील शेतीची अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची कार्यवाही तातडीने करण्याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्याना कळविण्यात आलेले होते. तदनंतर दि. ९ मार्च, २००७ च्या परिपत्रकान्वये सदर कार्यवाही तीन महिन्यात पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. तथापि बहुतांश जिल्ह्यात उपरोक्त कालावधीमधील नियमानुकूल करण्याबाबतची बरीच प्रकरणे अद्यापि प्रलंबित असल्याचे (कृ.मा.पा.)

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
शाखा:-
आवक नं.:- ROTA | H 2333 (600-12-08) 1

C:\Documents and Settings\Administrator\Desktop\J-1-2008/Letter-J-1.lwp/218

22 DEC 2008

विशेष नोंद वही नं.:- 80894
कार्य विवरण नं.:-
प्र. लि. जिल्हाधिकारी

24 DEC 2008

अतिक्रमणधारक तसेच लोकप्रतिनिधींनी शासनाच्या निदर्शनास आणले आहे. त्यामुळे यासंदर्भात पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

३. शासन निर्णय दि.२८.११.१९९१ व शासन निर्णय दि.२२.४.१९९२ मधील अटी व शर्तीनुसार शासकीय पड / गायरान जमिनीवरील शेतीची अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबतची कार्यवाही अद्याप पुर्ण झालेली नाही अशा प्रकरणी खास मोहिम काढून सहा महिन्याच्या आत अशी प्रकरणे कालबध्द रितीने निकाली काढण्याच्या दृष्टीने पुढील कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा :-

(i) ही मोहिम संपूर्ण राज्यात दि.५.१२.२००८ पासून सुरु करण्यात यावी.

(ii)सदर मोहिमेंतर्गत तालुका स्तरावर विशेष शिबिरे घेण्यात यावीत.

(iii) सदर मोहिमेस तालुका, मंडळ व सजा स्तरावर व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

(iv) सदर मोहिमेकरीता आवश्यकता भासल्यास जिल्हाधिकारी यांनी अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करुन द्यावे.

(v) सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी प्रलंबित प्रकरणाबाबत केलेल्या कार्यवाहीचा मासिक बैठकीत आढावा घ्यावा.

(vi) अपात्र ठरणारी व नियमानुकूल न होऊ शकणारी अतिक्रमणे तातडीने काढून टाकून सदर जमिनींचा ताबा घेण्यात यावा व सदर जमिनींवर पुन्हा अतिक्रमण होणार नाही, या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करावी.

४. वरील आदेशानुसार परिणामकारक व कालबध्द रितीने कार्यवाही पुर्ण करण्याची जबाबदारी संबंधित विभागीय आयुक्त यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ज. का. घरत)
उप सचिव
महसूल व वन विभाग

प्रत : सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व उप विभागीय अधिकारी
सर्व तहसिलदार.
मा. मंत्री (महसूल) यांचे खासगी सचिव
मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खासगी सचिव.
अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक.
इतर मंत्रालयीन विभाग.
'ज' समुहातील सर्व उपसचिव / अवर सचिव / कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
कार्यासन ज-१, महसूल व वन विभाग निवडनस्ती.

H 2333 -13
C:\Documents and Settings\Administrator\Desktop\J-1-2008/Letter-J-1.lwp/219